क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१०१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ५ डिसेंबर, २००१.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २००१ (गुरुवार) रोजी झालेल्या १०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :-
शासनाचे प्रधान सचिव (२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
आवक क्र. ४०४/२००१
दिनांक ७/१२/२००१

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## १०१व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १३ सप्टेंबर, २००१ (गुरुवार)

वेळ : दुपारी ३.०० वाजता

सभास्थान : मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,
६वा मजला, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| डॉ.सय्यद अहमद<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.सुनिल तटकरे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उप सभापती,<br>विधान परिषद | सदस्य |
| श्री. दत्ताराम दळवी<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ.महेता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.व्ही.रंगनाथन<br>शासनाचे मुख्य सचिव<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

श्री.क.चं.श्रीवास्तव सदस्य
महापालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री.अवधेश प्रसाद सिन्हा सदस्य
शासनाचे प्रधान सचिव (१)
नगर विकास विभाग

श्री.रवि भूषण बुध्दिराजा सदस्य
शासनाचे प्रधान सचिव
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग

श्री.अजित वर्टी सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री.रामानंद तिवारी
शासनाचे प्रधान सचिव (२)
नगर विकास विभाग

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी श्री. दत्ताराम दळवी, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य म्हणून प्रथमच बैठकीस उपस्थित रहात असल्याने त्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्रमांक १ : दिनांक १७ मे, २००१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१००व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

वाव क्रमांक २ : दिनांक १७ मे, २००१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१००व्या) वैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

वाव क्रमांक ३ : वडाळा भारवाहक तळातील अ-१, ब-१, ब-२ व ड-२ या इमारतीतील रिकाम्या गाळयांचे वाटप करणे.

१. या विषयाबाबत महानगर आयुक्त यांनी खुलासा केला की, प्राधिकरणाने भारवाहक तळ येथे विविध वापराकरीता २८३ गाळे बांधले आहेत. त्यापैकी वेळोवेळी जाहिरात देऊनही फक्त १४२ गाळयांचे वाटप वाहतुकदारांना करण्यात आले आहे. तथापि, १४१ गाळे अजुनही रिकामे असून त्यांचे वाटप करणे बाकी आहे. रिकामे गाळे वाटपासाठी प्राधिकरणाने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. जाहिरातीमध्ये निविदासाठीचा कालावधी दिनांक २६ डिसेंबर, २००० ते २५ जानेवारी, २००१ पर्यंत होता. सदर कालावधीतही रिकाम्या गाळयांच्या वाटपासाठी प्रतिसाद जास्त न मिळाल्यामुळे सदरहू निविदेचा कालावधी वाढविण्यात आला होता. गाळयांकरीता दर चौरस मीटरला रु.१२०००/- राखीव दर ठेवण्यात आला होता. छाननी अहवालानंतर एकूण प्राप्त ३० निविदांपैकी २७ निविदा पात्र आहेत असे आढळून आले. २६ गाळयांसाठी प्रत्येकी १ निविदा प्राप्त झाली आहे. तसेच राखीव दरापेक्षा निविदांमधील दर जास्त असल्यामुळे स्विकारण्यात याव्यात असे बाब टिप्पणीत प्रस्तावित करण्यात आले आहे.

२. तसेच अ-१ इमारतीतील गाळा क्र. २०८ साठी श्री. नायडू जयबालू राजू व पंजाब ॲन्ड महाराष्ट्र को. ऑप. बँक अशा दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. बँकेची निविदा

जास्त दराची म्हणजे प्रति चौ.मी. रु. १२,५७२/- असल्याने त्यांना जागा देण्याची शिफारस प्राधिकरणास केलेली आहे. श्री. नायडू जयबालू राजू यांची निविदा कमी किंमतीची असल्यामुळे त्यांना अ-१ इमारतीमधील क्र.२०८ चा गाळा वाटप न झाल्यास त्याच इमारतीमधील गाळा क्र३०८ चे (परिबध्द क्षेत्र ७३.३४ चौ.मी.) वाटप करावे त्यासाठी निविदा-मधून सर्वात जास्त आलेला दर देण्यास ते तयार असल्यामुळे बाब टिप्पणीत त्यांना गाळा देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

३. त्याप्रमाणे निविदांमध्ये जास्तीत जास्त नमूद केलेला दर अ-१, ब-१, ब-२ व ड-२ या इमारतीमध्ये तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला व तिसरा मजल्यावरील रिकाम्या असलेल्या उर्वरित सर्व गाळयांना जो "**प्रथम येईल त्यास प्रथम पसंती**" या तत्वावर खालील निश्चित दराने पुढील एका वर्षाच्या कालावधीत वितरीत करण्यात यावे.

| | |
|---|---|
| १) तळमजला | - रु.१५,१३६/- प्रति चौ.मी. |
| २) पहिला मजला | - रु.१३,४७५/- प्रति चौ.मी. |
| ३) दुसरा व तिसरा मजला | - रु.१२,५७२/- प्रति चौ.मी. |

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९०९ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-२, मध्ये वर्णन केलेल्या उच्चतम दराच्या २६ निविदा स्विकारण्यास

मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे श्री. नायडू जयाबालू राजू यांना अ-१ इमारतीमधील ७३.३४ चौ.मी. परिबद्ध क्षेत्र असलेला गाळा क्र.३०८ रु.१२,५७२/- प्रति चौ.मी. या उच्चतम दराने बाब टिप्पणीच्या परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वितरीत करण्यात यावा. त्याचप्रमाणे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ३ अपात्र निविदाकारांना त्यांची अनामत रक्कम परत करण्याची तसेच पात्र निविदांचा वैध कालावधी दि.२५/९/२००१ पर्यंत वाढविण्याची महानगर आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, अ-१, ब-१, ब-२ व ड-२ या इमारतीतील रिकामे असलेले उर्वरित सर्व गाळे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-६ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे "प्रथम येईल त्यास प्रथम पसंती" या तत्वावर तळमजल्यावरील गाळयांसाठी रु.१५,१३६/- प्रति चौ.मी., पहिला मजल्यासाठी रु.१३,४७५/- प्रति चौ.मी. आणि दुस-या व तिस-या मजल्यासाठी रु.१२,५७२/- प्रति चौ.मी. या निश्चित दराने वितरीत करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. या योजनेसाठी दिनांक १ ऑक्टोबर, २००१ पासून पुढे एक वर्षाचा कालावधी वैध राहील.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाययोजना करण्यास याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्रमांक ४ : वडाळा भारवाहक तळातील टप्पा-१ येथील कार्यशाळा व मोटरचे सुट्टे भाग यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण.

महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वडाळा भारवाहक तळातील टप्पा-१ येथील कार्यशाळा व मोटरचे सुट्टे भाग यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडासाठी एकूण १६ निविदा प्राप्त झाल्या होत्या. निविदांची छाननी केल्यावर ५ भूखंडासाठी १० निविदा पात्र असल्याचे आढळून आले. भूखंड क्र.१,३,४ व ५ अशा एकूण चार भूखंडासाठी एकापेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या असून, भूखंड क्र.२ साठी एकच निविदा प्राप्त झाली असल्यामुळे ती स्वीकारण्याची शिफारस बाब टिप्पणीमध्ये केली आहे. तसेच भूखंड क्र.२,४ व ५ साठी एकापेक्षा जास्त निविदा असल्यामुळे प्रत्येक भूखंडासाठी सर्वात उच्चतम रक्कमेची निविदा स्विकारण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

भूखंड क्र.३ बाबत श्रमजीवी लोकांच्या नोंदणीकृत संघटनेस काही सवलती किंवा प्राधान्य देण्याबाबत शासनाचे धोरण आहे किंवा कसे याची माहिती शासनाकडून अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदरहू गाळयांचे वितरण सद्या प्रलंबित ठेवावे व शासनाकडून माहिती मिळवून प्रस्ताव पुढील बैठकीसमोर ठेवावा असे ठरले.

त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९१० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-२,मध्ये नमूद केलेल्या उच्चतम दराच्या ४ निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जर पात्र

उच्चतम निविदाकारांपैकी कोणी प्राधिकरणाचा देकार स्वीकारला नाही तर त्यांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करुन त्याखालोखाल पात्र असलेल्या निविदाकारास संबधित भूखंडास प्राप्त झालेली उच्च रक्कम देण्यास तयार असल्यास त्यास संबधित भूखंडाचा देकार देण्यात यावा.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, परिच्छेद-५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उर्वरित निविदा नामंजूर करण्यास व त्यांनी भरलेल्या अनामत रक्कमा त्यांना परत करण्यासही प्राधिकरण मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाय योजना करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्रमांक ५ :</u> <u>वडाळा भारवाहक तळातील टप्पा-१ येथील ट्रक वॉशिंग यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण.</u>

महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, ट्रक वॉशिंग यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण करण्यासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या असून मे.बिपीन ट्रान्सपोर्ट कंपनी यांनी रु.५१.५१ लाख इतकी उच्चतम रक्कम निविदेमध्ये भरलेली आहे. त्यास सदरहू भूखंडाचे वितरण करण्यात यावे असे प्रस्तावित केले आहे. जर त्यांनी ठराविक कालावधीत देकार स्वीकारला नाही तर, त्यांनी भरलेली अनामत रक्कम रु.३/- लाख जप्त करण्यात येईल. तसेच राहीलेले दोन पात्र निविदाकारांपैकी जे भूखंडास उच्च रक्कम देण्यास तयार असतील त्यांना भूखंडाचा देकार देण्यात यावा असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

जर उर्वरित निविदाकार उच्चतम रक्कम देण्यास तयार नसतील, तर सदर भूखंडासाठी पुन्हा निविदा मागविण्यात येतील.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९११ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकरांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-५, मध्ये नमूद केल्याप्रमाणे मे. बिपिन ट्रान्सपोर्ट कं. यांची उच्चतम गुण मिळालेली रु.५१.५१ लाखांची निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जर पात्र उच्चतम निविदाकाराने प्राधिकरणाचा देकार स्वीकारला नाही तर त्यांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करुन राहिलेल्या दोन निविदाकारांपैकी जो भूखंडास प्राप्त झालेली उच्चतम रक्कम रु.५१.५१ लाख देण्यास तयार असेल त्यास भूखंडाचा देकार देण्यात यावा. परंतू दोघांपैकी मे. एम. आर. ट्रान्सपोर्ट कं. यांचे गुण जास्त असल्याने प्रथम देकार त्यांना देण्यात यावा.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, परिच्छेद-६ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे उर्वरित निविदा नामंजूर करण्यास व त्यांनी भरलेल्या अनामत रक्कमा त्यांना परत करण्यासही प्राधिकरण मान्यता देत आहे."

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाययोजना करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. "

बाब क्रमांक ६ : **वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रामध्ये आयकर विभागास वाटप केलेल्या वाणिज्य वापराच्या भूखंडापोटी भरावयाच्या अधिमुल्याची उर्वरित रक्कम भरण्यास उशीर झाल्यामुळे देय व्याज माफ करण्याबाबत आयकर विभागाची विनंती..**

महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, आयकर विभागास भूखंड देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली होती. आयकर विभागाने भूखंडाच्या अधिमुल्याच्या ५०% पेक्षा जास्त रक्कम म्हणजे रु.२९.५० कोटी, दिनांक ३०.३.२००१ रोजी अदा केली आहे. उर्वरित अधिमुल्याची रक्कम अदा करण्याकरीता आयकर विभागाने दिनांक ३०.१०.२००१ पर्यंत मुदतवाढ मिळावी व त्यावर प्राधिकरणाने व्याज आकारु नये अशी विनंती केली आहे. आयकर विभाग हा केंद्रशासनाचा विभाग असल्यामुळे सदरहू मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित केले आहे.

प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी या संदर्भात असे सांगितले की, आयकर विभागास उर्वरित अधिमुल्याची रक्कम भरण्यासाठी दिनांक ३० जुलै, २००१ पर्यंत तीन महिन्यांची मुदत नियमानुसार या अगोदर देण्यात आलेली आहे. आयकर विभागाने अधिमुल्याची उर्वरित रक्कम या मुदतीत भरलेली नाही. त्यांना अधिमुल्याची उर्वरित रक्कम व्याज न आकारता भरण्यास दिनांक ३१ ऑक्टोबर, २००१ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. परंतु उर्वरित अधिमुल्याची रक्कम दिनांक ३१.१०.२००१ पर्यंतच्या वाढीव कालावधीत न भरल्यास सदरहू उर्वरित अधिमुल्याच्या रक्कमेवर जुलै, २००१ पासून १४% व्याज आकारावे. सदरहू सूचनेस मा.अध्यक्षांनी मान्यता दिली.

त्यानंतर, प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९१२

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७, च्या नियम क्र.९ (एक) हा शिथिल करुन, प्राधिकरण आपल्या दिनांक १७.२.२००१ रोजी झालेल्या बैठकीत या संदर्भात पारित केलेल्या ठराव क्रमांक ८८२ मधील दुस-या परिच्छेदात सुधारणा करुन तो पुढीलप्रमाणे पारित करीत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्रथम आयकर विभागास त्यांच्या कार्यालयीन उपयोगासाठी ९५०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करण्यास, आयकर विभागाने अधिमुल्याच्या ५०% रक्कम दिनांक ३०.४.२००१ पर्यंत व उर्वरित अधिमुल्याची रक्कम त्यानंतर दिनांक ३१.१०.२००१ पर्यंत भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. उर्वरित अधिमुल्याची रक्कम या मुदतीत न भरल्यास त्या रकमेवर दिनांक ३१.७.२००१ पासून द.सा.द.शे. १४% या दराने व्याज आकारण्यात यावे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या नियम क्र.१६ नुसार प्राधिकरणाला हे नियम शिथिल करण्याचा जो अधिकार आहे त्याचा वापर करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या नियम क्र.९ (एक) हा नियम या वाटपाच्या संदर्भात शिथिल करुन मान्यता देत आहे."

बाब क्रमांक ७ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील उपलब्ध असलेला एक निवासी भूखंड बँक ऑफ इंडियाच्या कर्मचारी वर्गाच्या निवासस्थानासाठी वापराकरीता देण्याबाबत..

महानगर आयुक्त यांनी यांनी असे सांगितले की, बँक ऑफ इंडिया कर्मचारी वर्गाच्या निवासस्थानासाठी वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये उपलब्ध असलेला एक भूखंड रु.२१२३८ प्रति चौ.मि. च.क्षे.नि. या दराने देण्यात यावा. सदरहू जागेचा दर प्राधिकरणाने या अगोदर मागविलेल्या जुलै, २००० मध्ये उच्चतम होता. जमिनीच्या भावात वाढ झाल्याचे आढळून येत नसल्यामुळे बँक ऑफ इंडियाला सदरहू भूखंड देण्याची शिफारस करण्यात आली आहे. बँक ऑफ इंडिया केंद्रशासनाच्या उपक्रमात येत असल्यामुळे प्राधिकरण त्यांना मुं.म.प्र.वि.प्रा. (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) मधील तरतूदीनुसार भूखंड देवू शकते.

त्यानंतर, प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९१३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोट कलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) चा नियम ४ (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील ३६०६.७३ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड क्र. आर-४डी ज्यावर ५४१०.१० चौ.मी. इतके अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र उपलब्ध आहे तो भूखंड मुं.म.प्र.वि.प्रा. (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) च्या "डी" नमुन्यातील ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने कर्मचारी निवासस्थानासाठी बँक ऑफ इंडिया यांना वाटप करण्यासाठी प्राधिकरणाच्या सर्व

प्रचलित नियमानुसार तसेच अटी व शर्तीच्या अधीन राहून रु.२१,२३८/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराच्या अधिमूल्याने वाटप करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

"असा ठराव करण्यात येत आहे की, ठरावाची अंमलबजावणी करण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे "डी" नमुन्यातील भाडेपट्टा विलेखाच्या नमून्यात योग्य ते बदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्रमांक ८ : प्राधिकरणाच्या व तिच्या कार्यकारी समितीच्या अशासकीय व तज्ञ सदस्यांना बैठक उपस्थितीसाठी बैठक शुल्कामध्ये वाढ करणेबाबत.

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९१४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० सोबत उक्त अधिनियमाच्या कलम ४ चे उप-कलम (५) खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण बाब टिप्पणीच्या परिशिष्ट-४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) (दुरुस्ती) विनियम, २००० मध्ये आणि तिला राज्य शासनाची मान्यता मिळेल या गृहितकाच्या अधिन राहून याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी झालेल्या बैठकीतील आपला ठराव क्र.८३४ रद्द करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनाला विनंती करण्याकरीता महानगर आयुक्तांना याद्वारे निर्देशित करण्यात येत आहे."

<u>बाब क्रमांक ९ :</u> <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे २०००-२००१ सालचे वार्षिक लेखे.</u>

प्राधिकरणाचे सन २०००-२००१ चे विविध फंडाचे लेखे प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले. मूळ अर्थसंकल्प, सुधारीत अर्थसंकल्प व लेख्यात दाखविण्यात आलेली जमा व खर्चाची तुलनात्मक माहिती स्पष्टीकरणासह लेख्यांसोबत जोडली आहे. प्राधिकरणास सन २०००-२००१ वर्षात जमीन विक्रीपोटी, इतर भांडवली जमा व महसुल जमा तसेच विविध प्रकल्पांवर प्राधिकरणाने केलेला खर्च व प्रकल्पांसाठी दिलेले कर्ज तसेच मागील वर्षी प्राधिकरणास रु.२६१.७१ कोटी इतके निव्वळ महसूली अधिक्य प्राप्त झाले आहे असे मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी सांगितले.

याबाबत प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी, मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ महसुली अधिक्य कमी असल्याची विचारणा केली असता, मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, सिडको, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग (शिवशाही प्रकल्प), कृष्णा खोरे विकास महामंडळ या संस्थांना प्राधिकरणाने ठेव म्हणून रक्कम दिली आहे. परंतु त्या ठेवींवर वरील संस्था व्याज देत नसल्यामुळे त्यांची तरतूद लेख्यात करण्यात आलेली नाही. त्यामुळे निव्वळ महसुली अधिक्य २०००-२००१ मध्ये कमी दिसते.

त्यानंतर, मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्राधिकरणाची ठेव शासनाच्या आदेशानुसार शासनाच्या विविध संस्थेच्या उपक्रमात किती गुंतवली आहे याची विचारणा केली असता,

मार्च २००१ पर्यंत प्राधिकरणाकडे असलेल्या एकूण ठेव रक्कम रु.२७२८.१८ कोटींपैकी रु.१२०३.२९ कोटी इतकी रक्कम शासनाच्या विविध उपक्रमात गुंतवली गेली असून, त्यावर मार्च, २००१ अखेरीस रु.२९५.७६ कोटी व्याज प्राधिकरणास येणे आहे असे मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी नमूद केले. यावर अध्यक्षांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना प्राधिकरणाने शासनाच्या विविध संस्थेत गुंतविण्यात आलेल्या ठेवींचा आढावा घेण्यास सांगितले.

महानगर आयुक्त यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २४ नुसार मागील वर्षाचा प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल (लेख्यांसह) प्राधिकरणाने दिनांक ३० नोव्हेंबरपूर्वी शासनाकडे सादर करावा अशी अधिनियमात तरतूद असल्याचे सांगितले. गेल्या वर्षी माजी प्रधान महालेखाकार (लेखा परिक्षा), महाराष्ट्र यांनी प्राधिकरणाचे लेखे प्रथम प्राधिकरणाकडून मान्य करुन घ्यावेत. तद्नंतर सदरहू लेखे महालेखाकार यांचेकडे तपासणीसाठी पाठवावेत, सदर लेख्यांची तपासणी झाल्यावर तपासणी अहवाल लेख्यांसह पुन्हा प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी ठेवावे असे मत प्रदर्शित केले आहे. तसेच प्राधिकरणाचा लेख्यांबाबतच्या अहवालास नियंत्रक व महालेखापरिक्षक (Comptroller And Auditor General, New Delhi) यांची मान्यता मिळाल्यानंतर तो प्राधिकरणाकडे पाठविण्यात येतो असेही सांगितले. सर्वसाधारणपणे लेखापरिक्षणाचा अहवाल हा प्राधिकरणाकडे दिनांक ३० नोव्हेंबर पूर्वी प्राप्त होत नाही. त्यामुळे वार्षिक अहवाल लेख्यांसह शासनास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २४ च्या तरतुदीनुसार सादर करणे शक्य नाही. याबाबत महानगर आयुक्त हे श्री.के.एस.मेनन, प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा), महाराष्ट्र यांच्याबरोबर पुन्हा चर्चा करणार आहेत असे नमूद केले.

त्यानंतर, प्राधिकरणाने सन २०००-२००१ च्या प्राधिकरणाच्या वार्षिक लेख्यांना मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९१५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणी सोबत सादर केलेल्या प्राधिकरणाच्या २०००-२००१ सालच्या वार्षिक लेख्यांची प्राधिकरण याद्वारे नोंद घेत आहे व त्यास मान्यता देत आहे."

बाब क्रमांक १० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा २०००-२००१ सालचा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाचा सन २०००-२००१ चा प्रारुप वार्षिक अहवाल मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९१६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या २०००-२००१ सालच्या वार्षिक अहवालास हे प्राधिकरण मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

इतर विषयाबाबत झालेली चर्चा :-

मुख्य सचिव यांनी महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीच्या स्थापनेच्या प्रगतीसंबंधी माहिती देतांना अध्यक्षांना सांगितले की, महानगर आयुक्त यांनी शासनास रु.२६.०३ कोटी देण्याचे प्रस्तावित केले असून, शासनातर्फे ही रक्कम निधीच्या विश्वस्त निधीमध्ये अंशदान

म्हणून देण्यात येईल. याबावत सहमती व्यक्त करतांना अध्यक्षांनी निधीची स्थापना लवकरात लवकर करण्यासंबंधी सूचना केली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

*************